९ **हेमंत श्रीधर**– श्रीधर वासुदेव यांचा तृतीय पुत्र. जन्म– १५–१–१९५६. बी. एस. सी.

८ **वामन वासुदेव**– वासुदेव रघुनाथ यांचा तृतीय पुत्र. जन्म– १२–३–१९१४. मृत्यू ६-२-१९६४. एल. सी. पी. एस. व्यवसाय डॉक्टरी– वास्तव्य– विजापूर. पत्नी–केशव विनायक केळकर, वकील यांची कन्या. यांस पुत्र तीन सुहास, श्रीपाद व मोहन व कन्या तीन– १) शोभा दाते. २) विजया. ३) जयश्री. वामन वासुदेव हे विजापूरात प्रख्यात डॉक्टर होते. धार्मिक, उदार वृत्ती, अनाथांना मदत. विजापूरात सिटी हॉस्पिटलचे संस्थापक. तसेच त्यांनी म्हैसूर राज्यात मराठी शाळेचा पुनरुद्धार केला. रोटरी क्लबात कार्यकर्ता. नाट्य-संस्था इ. इतर व्यवसाय.

७ **गोपाळ रघुनाथ**- रघुनाथ गोविंद यांचा तृतीय पुत्र. जन्म– १८८२. मृत्यू– १९५३ मेकॅनिकल इंजिनीयर, फोटोग्राफर व मोटार मेकॅनिकचा धंदा. वास्तव्य– जमखिंडी, विजापूर व महाड. यांस पुत्र एक– चंद्रमौळी व कन्या दोन– १) लीला गंगाधर कुंटे. २) विमल शंकर दाते. संक्षसूचीकार दाते यांच्या पत्नी.

८ **चंद्रमौळी गोपाळ**– गोपाळ रघुनाथ यांचा पुत्र मृत्यू. १९७०. एस. टी. त मेकॅनिक. यांस कन्या दोन– १) शैला– रोहिणी रविंद्र जोशी, पुणे. ज.१९५४.२)आशा–सुजाता श्रीनिवास गाडगीळ, वाशी.

५ **कृष्णराव बल्लाळ**–बल्लाळ गणेश यांचे द्वितीय पुत्र. १८५७चे वेळेस जमखिडीस खाजगी कारभारी होते. यांचे घराणे सुभेदार घराणे, म्हणून ओळखले जाते. यांचे पूर्वज पेशव्यांचे वेळी खानापूरचे सुभेदार होते. नंतर वास्तव्य– जमखंडी, १८५७ चे वेळेस (जमखिडीकरांचे अटक काळात) कृष्णराव बल्लाळ हे संस्थानचे कारभारी होते. पत्नी– गोपिका. यांस पुत्र दोन– कोन्हेरराव आबा व महादेवराव भाऊ. व कन्या एक– संतुबाई.

ह्यांनी पटवर्धनराजे यांचेकडून मर्दुमकीबद्दल सुभेदार हा किताब मिळविला त्यांच्यापुढे सात पिढ्यापर्यंत हा किताब चालू रहाणार आहे.

६ **कोन्हेर कृष्ण**– कृष्ण बल्लाळ यांचे ज्येष्ठ पुत्र. पत्नी– आनंदी. कन्या पाच १) मथु काळे २) द्वारका यादवाडकर ३) गोदू वैद्य. ४) मनु भिलवडीवर. ५) कुंटे, सांगली.

६ **महादेव कृष्ण**– कृष्ण बल्लाळ यांचे द्वितीय पुत्र. पत्नी– अन्नपूर्णा. यांस पुत्र तीन– विष्णू, जिवाजी व केशव व कन्या एक– सरस्वती.

७ **विष्णू महादेव**– महादेव कृष्ण यांचा ज्येष्ठ पुत्र जन्म– १८५९ मृत्यू– २६-४-१९३४. मॅट्रीक. सरकारी नोकरी– जमखिडीचे पोलीस इन्स्पेक्टर, संस्थान जमखिडी. पत्नी– अन्नपूर्णा उर्फ लक्ष्मी. यास पुत्र दोन– गोपाळ व दामोदर.

८ **गोपाळ विष्णु**– विष्णु महादेव यांचे ज्येष्ठ पुत्र. जन्म– १८७८. मृत्यु– २४-४-१९५३. मॅट्रीक संशोधक– पेरणीयंत्र. कारखानदार. वास्तव्य– जमखिडी पत्नी– सत्यभामा–जन्म– १९००. मृत्यु. ५-७-१९७०. वैद्यकीय शिक्षण– आर. एम. पी. वैद्यकीय व्यवसाय करीत. यास पुत्र एक– बल्लाळ उर्फ बळवंत व कन्या आठ– १) काशी– गोडबोले, विजापूर. २) कृष्णा पेंडसे, किवळे. ३) तंगुताई लिमये, रामदुर्ग. ४) शांता नवो, रामदुर्ग. ५) चंपा खांबेटे, सातारा. ६) अंबू भिडे, मुंबाजी द. कारवार. ७) मिनाक्षी भिडे, द. कारवार. ८) शकुंतला गोवंडे, सांगली.

९ **बळवंत(बल्लाळ) गोपाळ**– गोपाळ विष्णु यांचा पुत्र. जन्म– ६-९-१९२०. मॅट्रीक. सरकारी नोकरी. वास्तव्य– पुणे. पत्नी– मालती– मालती केशव गाडगीळ बेळगाव. जन्म– १६-५-१९२९. यांस पुत्र दोन– विष्णू उर्फ विलास व विजय उर्फ रामचंद्र.

१० **विलास बळवंत**– बळवंत गोपाळ यांचा ज्येष्ठ पुत्र. जन्म– ९-११-१९४७. बी. ई. (सिव्हील) सरकारी नोकरी. वास्तव्य– पुणे.

१० **विजय बळवंत**– बळवंत गोपाळ यांचा द्वितीय पुत्र जन्म– ५-१२-१९४९. बी. एस्सी. बी. एड.

८ **दामोदर विष्णु**– विष्णु महादेव यांचा द्वितीय पुत्र. अविवाहीत जन्म– १८९१. मृत्यु– ३१-१२-१९५३. संशोधक, कारखानदार. वास्तव्य– जमखिडी.

७ **जिवाजी महादेव**– महादेव कृष्ण यांचा द्वितीय पुत्र. पत्नी– सगुणा. यास पुत्र चार– चिंतोपंत, लक्ष्मण, गणेश व वासुदेव व कन्या दोन– १) चंद्रा– अन्नपूर्णा चिंतामळा काळे, लिंब, सातारा-- जन्म– १९१२. मराठी ५. २) माणिक– पती विष्णु गणेश घैसास, कुंदगोळ. मृत.

८ **चिंतोपंत जिवाजी**– जिवाजी महादेव यांचा ज्येष्ठ पुत्र. वास्तव्य– जमखिडी. मोठे घर व शेती होती. पत्नी– आनंदी– बहिणा दत्तात्रय पोंक्षे, सावळगी. वास्तव्य– डोंबिवली. यास पुत्र पाच. बळवंत, काशिनाथ, हरी, गोविंद व मदन. व कन्या एक कुसुम– कुसुम गोरे एस. एस. सी. वास्तव्य– डोंबिवली.

९ **हरी चिंतोपंत**– चिंतोपंत जिवाजी यांचा तृतीय पुत्र. बी. ए. सध्या हैद्राबाद येथे रेल्वेत कामास आहेत. पत्नी– तारा– पिता सखाराम बर्वे, यास पुत्र एक– घनःश्याम व कन्या दोन १) कमल– २) जोत्स्ना.

१० **घनःश्याम हरी**– हरी चिंतोपंत यांचा पुत्र. डी. सी. ई.

९ **गोविंद चिंतोपंत**– चिंतोपंत जिवाजी यांचा चतुर्थ पुत्र. बी. ए. विक्रीकर अधिकारी, वास्तव्य– मुंबई. पत्नी– इंदू– पिता दत्तात्रय परांजपे. यांस पुत्र दोन– भालचंद्र व नितीन व कन्या एक– १) मीना एम. ए.

यांच्या माहितीप्रमाणे– तिरुपती येथील श्री व्यंकटेश यांचे महात्म्य यांचे घरात आहे. असे म्हणतात की, आमच्या पूर्वजांपैकी एकास वार्धक्यामुळे देवदर्शनासाठी तिरुपती येथे जाणे अशक्य झाल्याने देवाने त्यास आपणहून सांगितले की आता तुला येथवर येणे शक्य होणार नाही. तरी मीच तुझेकडे वास्तव्य करतो. तू पुढे राहून मागे वळून न बघता मला रस्ता दाखव. परंतु मागे वळून बघण्याचा मोह अनावर होऊन त्याने जेथे वळून पाहिले ते स्थान कल्हळी (ता. जमखिड) होय. तेव्हापासून देव भक्तासाठी कल्हळीला राहिला. कल्हळी येथील नवरात्रोत्सवात श्री व्यंकटेशास रथात बसवण्याचा मान आमच्या घराण्याचा आहे लग्न मौंजबंधनाची कुंकुमपत्रिका श्री व्यंकटेश कल्हळी येथे पाठविली जाते. व तीन पिढ्या सर्वतोपरी